# समाजभूषण सन्मानपत्र

आदरणीय श्रीमान मंगेश,

आपण आपल्या जीवन रथ चक्राची वाटचाल यशस्वीपणे सुरु करुन यशाचे अति अुच्च शिखर गाठण्याच्या दिशेने मार्गस्थ होत आहात, याचा आम्हा मंडळाच्या सर्व सदस्य बंधू भगिनींना अतुलनीय आनंद होत आहे. या मंगल क्षणी आपले सहर्ष अभिष्ट चिंतन करावे, पूर्व स्मृतींना उजाळा द्यावा, सुगंधीत फुलांनी बहरलेल्या परिजात वृक्षाप्रमाणे असलेले आपले सान्निध्य लाभावे म्हणून आज आम्ही एकत्र येऊन आपणास अभिवादन करीत आहोत.

मंगल नंदादीपाच्या शांत प्रकाशाप्रमाणे आल्हादायक असलेले आपले व्यक्तिमत्व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यामध्ये वसलेल्या नाटळ गावातील खांदारवाडीत, चाळीस वर्षांपूर्वी जन्माला आले, कष्टमय परिस्थितीत गरुडझेप घेण्यासाठी आवश्यक असलेला कणखरपणा, सोशीकता, अंगिकारीलेल्या कार्यामध्ये येणारे अडथळे खिलाडू वृत्तीने दूर करण्यासाठी कुशाग्र बुद्धिमत्तेचे दान नियतीने बालवयातच आपणास दिले. आपण आमच्या पूर्ण प्राथमिक शाळेचे इयत्ता तिसरी पर्यंतचे विद्यार्थी ! तद्नंतर मुंबईत जाऊन वाणीज्य शाखेचे पदवीधर झालात. पदवी संपादन केल्यानंतर नोकरीच्या पाठीमागे न लागता इतरांना नोकरी कशी देता येईल या मानसिकतेने आपण झपाटून गेलात आणि बांधकाम क्षेत्रात प्रवेश केलात. सुरवातीस रस्ते विकसीत करता करता आपण घरबांधणी व विकास क्षेत्रात पदार्पण केलेत व हा हा म्हणता मुंबई उपनगरातील विख्यात 'साईली डेव्हल्पर्सचे' मालक व व्यवस्थापकीय संचालक झालात. मुंबईच्या बोरीवली उपनगरातील म्हाडाची वसाहत विकसीत करताना आपण ८०० च्यावर दुर्बल समाज घटकाना गुणवत्तेने परीपूर्ण अशी घरे विनामोबदला बांधून दिलीत व त्यानंतर मात्र, आपली या क्षेत्रातील तूफानी घोडदौड सुरु झाली आणि आपण मुंबई उपनगरातील एक ख्यातनाम् गुणवान् बांधकाम विकासक म्हणून ओळखले जाऊ लागलात. या घोडदौडीत आपण आपली सामाजिक बांधिलकी न विसरता आपल्या समाजाच्या व गावाच्या विकासासाठी सढळ हाताने मदत करीत राहीलात. याच बांधिलकीने आपल्या गावच्या श्री रामेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केलात व वाडीतील लोकांसाठी, रस्ता, नळ योजना, इ. आपल्याच सहकार्याने कार्यान्वित केल्यात. आज आपण आपल्या प्राथमिक शाळेची बांधिलेली देखणी इमारत जिल्हा परिषदेसाठी बांधून देऊन 'शिक्षणासाठी काहीही' ही उक्ती सार्थ करुन दाखविलीत. आपली ही योगदाने आपल्या वाडीतीलच नव्हे तर संपूर्ण नाटळ गावाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहावीत अशीच आहेत व त्यामुळे आपल्या कुटुंबाचे नाव या जिल्ह्यातच नाही तर महाराष्ट्रात अजरामर झाले आहे. आम्हा ग्रामवासींचा आपण दिपस्तंभ आहात.

तुम्हाला भावलेला, जयाने हुरळून जायचे नसते! अपयशाने खचायचे नसते! हा मंत्र आम्हाला सदैव प्रेरणा देत असतो. आपल्या सारखे उत्तुंग, यशवंत, धीरोदात्त प्रेरणादायी व्यक्तिमत्व आम्हाला लाभले हे आमचे भाग्यच आहे.

सामान्यातून असामान्य कसे घडते त्याचे मूर्तिमंत प्रतिक म्हणजे आपणच! कुशाग्र बुद्धीमत्ता आणि अतुलनीय व्यासंग इत्यादी गुणांमुळे आपण स्वीकारलेल्या बांधकाम क्षेत्रांत अजोड अशी कामगिरी करीत आहात.

वंदनीय असे आपले व्यक्तिमत्व आमच्या समोर सतत असते. आपण यशोमंदिराकडे केलेल्या मार्गक्रमणामध्ये आपल्या सौभाग्यवती- मनाली वहिनी- यांचा मोलाचा सहभाग आहे हे निश्चितच. त्यांना सुद्धा या क्षणी आम्ही अभिवादन करीत आहोत. आपली सुकन्या साईली आपल्या जीवनांत आनंदाचे बागमळे फुलवीत आहे, तिचेही आम्ही कौतुक करीत आहोत.

तमोगुणांना आपण आपल्या जीवनांत कधीच तसा आसरा दिला नाहीत. आपण अजातशत्रू आहात, सदासर्वदा प्रसन्न राहून सभोवतालचे विश्व सुद्धा प्रसन्न ठेवण्याची आपली मनःशक्ती दूर्दम्यच आहे. आपले अत्युच्च यशोमंदिराकडील मार्गक्रमण सुखावह, आरोग्यदायक, सर्वांगिण प्रगतीचे होवो हीच आमची सदिच्छा।

यशवंत भव ! किर्तिवंत भव ! अयुष्यवंत भव !!

दिनांक : २६ फेब्रुवारी २००५

आपली सदैव सहकार्येच्छू

**श्री. मंगेश तुकाराम सावंत,** समाजभूषण समिती

(मौजे नाटळ खांदारवाडी-दुबळेश्वरवाडी, शिक्षणोन्नति मंडळ, मुंबई)

Scanned with CamScanner